९३६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
नं. क्र. १२५५४

# गप्पाष्टक

REFBK-0010871
REFBK-0010871

पद्माकर निमदेव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २०८६० वि: निबंध
क्रमांक ९२५४ नोंः दिः ५-१-५१
निबंध

# "गप्पाष्टक"

[ ललित निबंधाचा संग्रह ]

REFBK-0010871
REFBK-0010871

प

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (अमूल्य ग्रंथ)

रामकृष्ण बुक डेपो
गिरगांव, मुंबई ४.

: मुद्रक :

**शं. त्र्यं. आवटे,**

इंदिरा प्रिंटिंग प्रेस,

१००५ सदाशिव, पुणें २

◆◆

: प्रकाशक :

**वि. र. बाम,**

रामकृष्ण बुक डेपो,

गिरगांव, मुंबई ४.

◆◆

**किंमत एक रुपया**

प्रथमावृत्ति १९६०

माझी पत्नी

**सौ. प्रभावती,**

अन् मुलें

**चि. अविनाश,**

**चि. मीना,**

**चि. कमल,**

**चि. सुनंदा**

या सर्वांस सप्रेम—

# ऐकून घ्या !

मी लिहिलेल्या लघुनिबंधांपैकीं पंधरा लघुनिबंधांचं हें ‘ गप्पाष्टक’ आहे. लघुनिबंध हा गप्पाष्टकासारखाच असतो, नाहीं का ? म्हणूनच मी या लघुनिबंधांना ‘ गप्पाष्टक ’ हें नांव ठोकून दिलं. हें गप्पाष्टक वाचकांपर्यंत पोचविण्याचं काम माझे निकटचे स्नेही व मुंबई येथील रामकृष्ण बुकडेपोचे मालक श्री. बाळासाहेब बाम यांनीं केलं. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ते उत्तम चित्रकार असल्यामुळें हें गप्पाष्टक रंगविण्यास त्यांचीच मदत झाली आहे. आमचें गप्पाष्टक हें ऐकून घेण्यासाठीं नसून वाचण्यासाठीं आहे. तेव्हां आता वाचकांनीं हें पान उलटावें हीच विनंती.

**पद्माकर निमदेव,**
सरस्वति निवास,
राठोड प्लॉट,
अ म रा व ती.

दीपावलि
१९६०.

‘ स्फूर्ति– ’
नाटक
विश्वास
मृत्यु
त्यांत काय आहे हो—
मध्ये मध्ये
मनोराज्य
तिसऱ्या वर्गाचा प्रवास
तें सर्व आपणांपाशीं
संयम
आंवळी कोशिंबीर
पोषाख
नाद
शब्द
आजची कला
जागेपणांतील स्वप्नें
नशा

# “ स्फूर्ति ”

“ प्रिये !
रुसलीस ना तूं माझ्यावर ?
मग अजून का बरं येत नाहीस तू ?
कसोटी तर पहात नाहीसना माझी ?
देवसुद्धां भक्ताची एवढी कसोटी पहात नसेल !
खरं ना हें ?
मग प्रिये, लाडके !!
विरहाच्या कल्पनेनच जर अंतःकरणांत एवढी कालवाकालव होते;
तर, तर—
खरोखरच तुझा विरह झाला तर माझं कसं होईल ?
नुसत्या कल्पनेनंच—
पण कल्पनाच ठरूं दे ती बापडी ! ”
दोनच क्षण—
आरामखुर्चीवर पडलों. डोकं सुन्न झालं माझं.
पापणीला पापणी भेटली.
इतक्यांत—
वाऱ्याचा झोत आला, खिडकीचीं तावदानं खडखडलीं.
खोलीचा दरवाज़ा हळूच उघडला गेला.
वाऱ्याची गोड झुळूक डोक्याला आल्हाददायक वाटली.
चोर पावलांनीच दबकत दबकत प्रिया खोलींत शिरली.
एक जीव झाली. ती माझ्याशी भावना उचंबळून आल्या.
पेन हातांत घेतला अन् लिहिला मथळा—
‘ स्फूर्ति ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# नाटक

पांच सात वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. आमच्या विदर्भ नाट्य मंदिरातर्फे होणाऱ्या नाटकाच्या तालमीला मी रात्रीचा जात असे. एक दिवस रात्रीं मी असाच तालमीला गेलों होतों. तेवढ्यांत आमचे घरीं माझ्या वडिलांचे एक जुने स्नेही येऊन गेले. पत्नीकडून, मी तालमीला गेल्याचें त्यांना कळल्यावर ते मोठ्या तावातावाने उद्‌गारले, " कसली नाटकं करतात डोंबल्याचीं, नाटकं करूं नये, नी कधींही पाहूं नये. साठ वर्षाचं माझं वय होऊन गेलं, पण नाटक म्हणून आपण कधीं पाहिलं नाही. "

त्या दिवशीं मी तालमीहून घरीं आल्यावर सौभाग्यवतीने जेव्हा मला त्यांचा अभिप्राय सांगितला, तेव्हा तर मला हंसूच आले. माझ्या हंसण्याने किंचित् चिडून ती म्हणाली होती, " जुन्या माणसांचीं मतं तुम्हांला कधींच पटायचीं नाहींत. "

सुपारी कातरतां कातरतां मला त्या वृद्धाचें तें वाक्य पुन्हा आठवलें " नाटक कधीं करूं नये. "

नाटक कधीं करूं नये हें म्हणणें मीं मान्यहि केलें असतें; पण माझ्यासमोर नित्य होणारीं नाटकें पाहिलीं म्हणजे वाटतें—

एक दोन वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. आमच्या शाळेंत एक ई. ए. सी. आले होते. ते कोण आहेत म्हणून मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें; आणि कॉलेजचीं चार वर्षे सतत आमच्या समोरील बाकावर बसणारा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०६९

तो आठवले मला आठवला. ई. ए. सी. म्हणून तोच आला होता. आपण होऊन ओळख न देण्याचा माझा स्वभाव असल्यामुळें त्याचे-कडे मी पाहत राहिलों. त्यानेहि माझेकडे पाहिलें. त्याची आणि माझी जेव्हा ओळख करून दिली गेली तेव्हा हंसत हंसत तो बोलला, "आम्ही तर क्लास फेलोच आहोंत." मग माझ्या खांद्यावर हात टाकीत तो म्हणाला, "कसं काय चाललं आहे ?"

पाहिल्यावर ओळख न देतां, मग मात्र ओळख असल्याचें त्याने केलेलें 'नाटक' पाहून माझ्या मनांत आलें—केशवराव दाते हे कसलेले नट आहेत असें आजपर्यंत आपण ऐकत व पाहत आलों पण केशवराव दातेच नव्हे, तर आपल्या आजूबाजूची प्रत्येक व्यक्ति कसलेली नट आहे.

एखाद्या पैसेवाल्याकडे तुम्ही जा अन् त्याला थोडे पैसे मागा; दारिद्र्याने चेहऱ्यावर येणार नाहीं एवढी लाचारी आपल्या चेहऱ्यावर आणून तो म्हणेल, "मी यावेळीं फार अडचणींत आहे. नाहीतर तुमचं काम सहज केलं असतं."

आपल्या दुःखाबद्दल शोकोद्गार काढणारे पुष्कळ भेटतात, त्यांची सहानुभूति ही मनापासून आहे कीं वरवरची आहे हें ओळखणें अति कठीण जातें.

वरिष्ठ अधिकाऱ्याच्या भुक्कड विनोदाला हंसणारे, त्याच्या एवढ्याशा गुणाची तोंडभर स्तुति करणारे, तो जें जें सांगेल त्याला मान हलविणारे; हे सर्व एक प्रकारें नटच आहेत, नाही कां ? मनापासून अन्यायाची चीड येत असली, जुलुमाचा तिटकारा वाटत असला तरी

तो तसा न वाटूं देण्याचें 'नाटक' अनेक वर्षांच्या नोकरीमुळें त्यांना बेमालूम करतां येतें.

लहान मुलांना चूप बसावयाचें असलें म्हणजे, प्रत्येकजण रागावण्याचे 'नाटक' करतोच किनई? मनाजोगें पातळ मिळावें म्हणून कधीं कधीं पत्नी प्रेमाचें 'नाटक' करते, तर आवडता जिन्नस पोटांत जावा म्हणून पतिराज बेचव वरणाचे भुरके मारीत तिच्या सुग्रणपणाचें कौतुक करतोचना!

घरांत, समाजांत, राष्ट्रांत इतकेंच नव्हे तर साऱ्या जगांत प्रत्यही कुठलें ना कुठलेंलें तरी 'नाटक' हें चाललें असतेंच. आपण जसें आहोत, त्याच्या अगदीं उलट भासविण्याचा प्रयत्नपूर्वक 'अभिनय' बहुतेक सर्वजण करण्यांत मग्न आहेत.

जगांतील हीं सर्व "नाटकें" जेव्हां बन्द होतील त्यावेळीं मग मी त्या वृद्धाप्रमाणे म्हणेन, "नाटक कधीं करूं नये; इतकेंच नव्हे तर मी 'नाटक' करण्याचें एकदम बन्द करेन." * * *

# विश्वास

आठ दिवसांपूर्वीची गोष्ट असेल. औषध आणण्याकरितां म्हणून मी दवाखान्यांत गेलों होतों. बाकाच्या दोन तीन रांगा माणसांनीं भरून गेल्या होत्या. रोग्यांची दवाखान्यांत नुसती गर्दी होती. एका रिकाम्या जागेवर मी जाऊन बसलो. माझ्या 'नंबराची' वाट पाहण्याशिवाय मला दुसरी गतीच नव्हती. डॉक्टरचे हात आणि घड्याळाचे काटे सारखें चालू होते. अर्धा तास झाला, एक तास झाला—

जागच्याजागीं मी चुळबुळ करीत होतो. तेवढ्यांत दवाखान्याच्या दाराशीं विमानाच्या आकाराची एक धूसर रंगाची मोटार आवाज न करितांच येऊन उभी राहिली. मर्सराइझ्ड धोतर नेसलेला, कोशाचा लांब नेहरू शर्ट घातलेला, खादीची दोन बोटं रुंदीची स्वच्छ टोपी डोक्यावर असलेला एक मध्यम वयाचा गृहस्थ, आपला चकचकीत पंपशू वाजवीत दवाखान्यांत आला. त्याला पाहतांच डॉक्टरांच्या चेहऱ्यावर हसूं आलें.

" काय शेठजी कुणीकडे ? " डॉक्टरांनी हंसून त्यांचें स्वागत केलें.

" तपासून घ्यायचं आहे. " तो उत्तरला.

" अवश्य, " स्टेथस्कोप उचलीत त्याला आंतील खोलीकडे नेत डॉक्टर म्हणाले.

माझ्याजवळ बराच वेळ तिष्ठत बसलेला इसम मला म्हणाला, " आपण बसूनच आहोंत. आणि हा गिरणीचा मालक आत्तां येतो काय नी–तुम्ही कांहीं म्हणा, पण जग हें पैशावरच चाललं आहे हें खोटं नाहीं. "

त्या इसमाच्या त्या वाक्यावर मी तेव्हां कांहींच बोललों नाहीं. पण दवाखान्यांतून घरीं परतल्यावर मात्र राहून राहून मला त्याच्या त्या वाक्याचें आश्चर्य वाटूं लागलें. तो इसमच काय, पण जो तो असेच म्हणतो, "जग हें पैशावर चाललं आहे. " पण मला नाहीं तसं वाटत.

मला वाटतं जग हें पैशावर चालत नाही. तें चालतं दुसऱ्याच एका गोष्टीवर. ती गोष्ट म्हणजे ' विश्वास. '

बँकेंतून दिलेल्या नोटांचीं पुडकीं आपण खुशाल स्वीकारतों. नोटांवर लिहिलेल्या आंकड्याएवढे पैसे आपणाला कुठेहि मिळतील हा विश्वास असतो म्हणूनचना! तो विश्वास नसूं द्या, नोटांची किंमत, केराच्या टोपलींतल्या कागदाइतकीच सर्वजण करतील. पण तसें होत नाहीं.

मोटारच्या यंत्राची माहिती नसणारे असंख्य प्रवासी रोज मोटारींत बसून शेंकडों मैलांचा प्रवास करतात. कारण त्यांना विश्वास असतो कीं मोटार चालविणारा आपल्याला सुरक्षित पोंचविणार आहे. रात्रीच्या वेळीं आगगाडीच्या डब्यांत शांत चित्तानें झोंपणाऱ्या प्रवाशाला तसाच विश्वास असतो.

जग विश्वासावर चाललें नसतें, तर पतिपत्नींना आपलें विवाहित जीवन सुखानें तरी घालवितां आलें असतें का? विश्वासाच्या भरभक्कम पायावर आयुष्याची भव्य इमारत उभारली जाते. हा पाया थोडा खचूं द्या, आयुष्य मातीमोल होण्यास वेळ लागावयाचा नाहीं.

डॉक्टरने दिलेलें औषध विष आहे कीं अमृत आहे हें जाणण्याची किंचितहि पात्रता नसतां, रोगी घटाघट तें पितोच किनई! कां? त्याचा डॉक्टरवर विश्वास असतो म्हणूनच. शेंकडों रुपये पोस्टाच्या कारकुनाजवळ देणारा इसम, पोस्टखात्यावर असलेल्या विश्वासामुळेंच तसें करतो ना? विवाहाआधीं एखादी प्रेयसी आपल्या प्रियकराला चुंबनदान देतें, तें तो आपल्याशीं विवाह करील या विश्वासावरच ना!

हे विचार मनांत आले म्हणजे, "जग हें पैशावर चाललं आहे," असं म्हणणाऱ्या लोकांना मला बजावून सांगावेंसें वाटतें कीं, बाबांनो, जग हें पैशावर चाललें नाहीं. तें चाललें आहे "विश्वासावर!"

# मृत्यु

काय असेल तें असो. पण मी मात्र त्या दिवशीं चांगल्या मनस्थितींत नव्हतों. व्हरंड्यांतील आरामखुर्चीवर मी पडलों होतों. आणि जवळच लीला व्हरंड्यांतील एका खांबाला टेकून उभी होती. मी जोरांत जांभई दिली. तोंडासमोर हातानें चुटकी वाजवीत म्हणालों— " अरे देवा. "

माझ्याकडे वळून लीलानें विचारलें " कां हो काय झालं. अगदीं देवाला हांक मारायला लागला. "

मीं तिला उत्तर दिलें, " कांहीं नाहीं ग. जीवाचा अगदीं कंटाळा आला बघ. "

माझ्याजवळ येत लीला म्हणाली, " हें काय. कांहींतरीच काय बोलायचं ? "

माझ्या पत्नीचेंच काय, पण कुणाच्याहि जिभेवर हेंच वाक्य आलें असतें. मरण म्हटलें म्हणजे आपल्या प्रत्येकाच्या अंगावर कांटा उभा राहतो. मरणासारखी दुसरी हानि नाहीं ही गोष्ट खरी असली तरी मरणाच्या कल्पनेनें भिऊन जाणें ही मात्र त्याहीपेक्षां जास्त हानि नाहीं का ? जन्म आणि मरण या शरिराच्या दोन नैसर्गिक अवस्था आहेत. आपणांला जन्मापासून आनंद होतो, हर्ष होतो. मग मरणापासून तरी एवढें वाईट कां वाटावें ? " मरणं प्रकृतिः शरीरिणाम " हें जें म्हटलें आहे त्याचा गर्भितार्थ तरी काय आहे ?

पूर्वीच्या इतिहासाचीं पानें आपण चाळून पाहिलीं तर आपणांस मोठमोठ्या लोकांच्या आयुष्यांत हेंच सार दिसून येईल. मरणाची भीति असती तर त्यांनीं रणांगणावर कधींच पाय ठेवला नसतां. शास्त्रज्ञांनी मोठमोठे शोध लावले ते एखाद्या नावेंत जलक्रीडा करीत असतांना नाहीं. चार हातावर मृत्यु दिसत असून सुद्धां त्यांनीं आपले प्रयत्न सोडले नाहींत. जो मनुष्य मरणाला भितो तो जगण्याला सुद्धां भितो, असेंच म्हणावें लागेल. मरणाचें हंसतमुखानें स्वागत करणें हेंच खऱ्या वीरपुरुषाचें लक्षण आहे.

जो मनुष्य आपल्या कर्तव्यांत चुकत नाहीं, प्रत्येक गोष्टीशीं व व्यक्तीशीं तो कृतज्ञ असतो, त्या मनुष्याला मृत्यूचा पाश हा कधीं तरी घाबरवून सोडील का ? मृत्यूचा पाश हा त्याला एखाद्या पुष्पमाले–प्रमाणेंच वाटेल.

मृत्यूच्या भीतीनेंच आपण अर्मधेले होतों. मरणाची भीति वाटूं द्या पण ती कशी, तर-मृत्यु केंव्हां येईल याचा नेम नाहीं-लहान, थोर, गरीब, श्रीमंत, स्त्रीपुरुष; मृत्यूची पायली या सर्वांना एकाच मापानें मोजते. तिला फरक ठाऊक नाहीं. म्हणून आपलें आयुष्य केंव्हां सपेल आणि मृत्यु आपल्याला केहां हांक मारील याचा नेम नाहीं.एवढ्या-करितां आपल्याला आयुष्यांत जीवनांत, जें कार्य करावयाचें असेल, जें कर्तव्य पार पाडावयाचें असेल, तें काळाचा अपव्यय न करतां पार पाडलें पाहिजे. मृत्यू दाराशीं उभा असतांना जर त्याला आपण म्हटलें, " बाबारे, माझें थोडें काम शिल्लक राहिलें आहे. तेवढें पार पाडूं दे. मग मला खुशाल ने. " पण या वाक्यानें समजूत पटायाला मृत्यु म्हणजे

कांहीं आपली पत्नी नाहीं. गेलेला क्षण, गेलेला दिवस परत कधींच येत नाहीं, ही साधी गोष्ट जर प्रत्येक मनुष्य नीट लक्षांत ठेवील तर आळसांत अगर निरुद्योगीपणांत तो कधींतरी वेळ घालवील काय ? मृत्यु हा आपला एक उपदेशकच आहे. अप्रत्यक्षपणें तो आपल्याला सारखा बजावीत असतो कर्तव्याला जागृत राहा.

मृत्यु ही आयुष्यांत घडणाऱ्या विविध घटनापैकीं एक घटना आहे. माणसाला मृत्यूमुळें जें रडूं येतें,त्या अश्रूंच्या बुडाशीं बहुतांशीं स्वार्थ असतो हेंच खरें. जुने घर बदलून आपण एखाद्या चांगल्या अशा नवीन घरांत जातो. जुन्या घरांत जास्त दिवस राहिल्यानें आपल्याला त्याबद्दल प्रेम वाटतें हें खरें, पण नव्या घराच्या वातावरणांत दंग झाल्यावर जुन्या घराच्या पुसट आठवणीशिवाय आपल्या मनांत जास्त तें काय राहतें. मृत व्यक्तींची स्मृतीहि त्यासारखीच होते. नाहीं का ?

प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनींसुद्धां गीतेंत हेंच सांगितलें नाहीं का. जुनें वस्त्र टाकून जसें नवें वस्त्र परिधान करतो तसेंच मनुष्याचा आत्मा हा एक जीर्ण शरीर सोडून दुसऱ्या नव्या कुडींत प्रवेश करतो. आत्मा जर अमर आहे, तर आत्मा असलेल्या प्रत्येक शरीराला सुख, शांति, समाधान, तृप्ति देणें हें प्रत्येक मानवाचें कर्तव्य होऊं शकतें. आणि हें कर्तव्य न चुकतां जो जो बजावतो त्याला त्याला मृत्यु कदापि भिववूं शकत नाहीं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ................... वि: ..........
क्रमांक ....................... नों: दि: ..........

# त्यांत काय आहे हो

खंडवा स्टेशनवरचीच गोष्ट असेल ती. इंदोरला जाणाऱ्या गाडीला अवकाश असल्यामुळें पंजाबमेल उभी होती त्या फलाटावर मी येरझारा घालीत होतो.

" हॅलो–बाळ "

मी मागें वळून पाहिलं. अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजमध्यें बी. ए. ला माझ्याबरोबर असलेल्या अच्युत देशपांडेनी मला हांक मारली.

" अच्छा, तूं इकडे कुणीकडे ? " त्याच्याशीं हस्तांदोलन करीत मी विचारलें.

रेस्टॉरंटकडे जातां जातां तो म्हणाला, " मी चाललों आहे धुळ्याला. " आमचें चहापान झालें. नुकत्याच घेतलेल्या पासिंग शोचें पाकिट माझ्यापुढें करीत तो म्हणाला, " आतां कांहीं हरकत नाहीं ओढायला. We are gentlemen. "

धूम्रपान करीत करीत आम्ही देशपांडे बसणार होता त्या डब्यापाशीं आलों. देशपांडे म्हणाला,—" अरे तुझी ती ज्योत्स्नेंतली गोष्ट वाचली. तूं इतकं लिहितो खरं पण त्याचा काय उपयोग आहे रे ? "

गार्डची शिटी झाल्यामुळें देशपांडे डब्यांत शिरला. मी किंचित् हंसून उत्तर दिलं,—" लेका, तूं वाटेल तसं Smoking करतोस, काय उपयोग आहे रे त्याचा ? "

देशपांडेनें काय उत्तर दिलें असतें कोण जाणें. पण तेवढ्यांत गाडीला चांगलीच गती मिळाली.

मलाच असें म्हणत नाहीं मी. पण पुष्कळांना तसला अनुभव असेल. आतां तो मनुष्यस्वभाव आहे कीं काय न कळे. पण पुष्कळांना, एखाद्याने कोणतीही गोष्ट केली कीं म्हणण्याची संवय असतें— "त्यांत काय आहे हो, त्याचा काय उपयोग आहे." परंतु दुसऱ्याला अशीं वाक्यें सुनावणाऱ्यांना अशा कांहीं संवयी असतात कीं त्या संवयींचा काय उपयोग आहे हें त्यांचें त्यांनाच ठाऊक असतें किनई कोण जाणे.

मी असाच एकदां मुंबईला जात होतों. त्यावेळीं डब्यांतील एक दोघां गृहस्थांशीं माझ्या गप्पा झाल्या. गृहस्थ पोक्तच होते. मी पदवीधर आहे हें त्यांना ठाऊक नव्हतें. ते मला म्हणाले,—" नाहीं, तुम्हांला म्हणून एक सांगतो. हे लोक इतके शिकतात. बी. ए. एम्. ए., होतात पण काय अर्थ आहे त्याच्यांत. "

त्यांचें तें वाक्य ऐकून मला वाटलें—या गृहस्थाला, ' ढीन इंगचे एसेज, ' शेक्सपीयरचे ' हॅम्लेट ', शॉ चें, ' मॅन अँड सूपर मॅन,' आणून साधें वाचावयास लावावें; म्हणजे बी. ए. त किंवा एम्. अे. त काय अर्थ असतो नी काय नाहीं यांची त्यांना कल्पना येईल.

कुणीही, " काय अर्थ आहे हो त्यांत " असले तुच्छतादर्शक उद्गार काढले म्हणजे मला त्यांची फार कींव येतें. कोणतीही गोष्ट स्वतः करण्याची अंगांत धमक नसते. बरें दुसरा एखादा करीत असेल तर त्याचें कौतुक करण्याची खिलाडू वृत्ति अंगांत नसतें.

गेल्या मे महिन्यांतलीच गोष्ट असेल. गणेश थिएटरांत श्री. अत्रे यांचें व्याख्यान होतें. व्याख्यानाहून आम्ही परत येत होतों. माझा एक मित्र म्हणाला,—" काय अर्थ आहे अत्र्याच्या व्याख्यानांत "

'त्यांच्या व्याख्यानांत अर्थ असो अगर नसो तो प्रश्न वगळो. परंतु थिएटरांतील प्रेक्षकांना दीड-दोन घंटे सारखें हसत ठेवणारे व्याख्यान देणें हें काम खासच सोपें नाहीं. परंतु कुठल्याही माणसांतील गुण पाहण्याकडे आमची प्रवृत्ति असेल तेव्हांना. स्वतःलाही येत नाहीं, बरें, दुसरें करीत असतील तर त्यांचेंही कौतुक करावयाचें नाहीं.

आपण ज्या गोष्टी करतो त्या प्रत्येकीचा कांही ना कांहीं उपयोग असावा हा कुठला अट्टाहास. अगोदरच आजकाल पांढरपेशांचें जीवन खडतर झाले आहे, वयाच्या तिशीपर्यंत आर्थिकदृष्ट्या स्थैर्य नाहीं. आज लागलेली नोकरी उद्यां राहीलच याची शाश्वति नाहीं. अशा परिस्थितींत एखाद्या तरुणाने जर एखादी नवी गोष्ट केली तर, "त्यांत काय आहे हो एवढं मोठं—" याचा अहेर त्याला मिळतो.

उलट एखाद्या सुखवस्तु गृहस्थाने जर एखादी नवीन गोष्ट केली तर लगेच, "नवा उपक्रम, स्तुत्य उपक्रम" म्हणून त्याचा उदो उदो होतो.

"त्यांत काय आहे हो" असं म्हणण्यांत जर खरोखरीच अर्थ असता तर, आगगाड्या, तारायंत्र, बिनतारी तारायंत्र, जहाजें मोटारी विमाने....एक ना दोन हजारों गोष्टींचा शोध व प्रगति आजच्या स्थितीला आपणांला दिसूं शकली असती का. त्याचा उपयोग नि त्यांत काय आहे—असें म्हणणाऱ्यांचा वर्ग पाहिला म्हणजे मला वाटतं—असल्या लोकांनीं खुशाल हिमालयांत जाऊन राहावं.

आम्ही त्यावेळीं एम्. ए. च्या क्लासेसना जात होतो. लघुकथांचा एक स्वतंत्र पेपर आम्हांला होता. पेपरावरून गोष्टी निघतां निघतां

मी सहज म्हटलं–" बाकी खांडेकरांची खरंच कमाल आहे हं. इतक्या उत्कृष्ट गोष्टी लिहिणं कांहीं सोपं काम नाहीं."

त्यावर एकजण म्हणाला, " अं त्यांत काय आहे मोठंसं— "

त्याचें तें वाक्य ऐकून माझ्या मनांत आलें—उचलली जीभ अन् लावली टाळ्याला यांतलाच हा प्रकार आहे. गृहस्थाने मराठीच्या पेपरांत काय तें मराठी लिहिलें असेल.

शेंकड्यानें गोष्टी लिहिणें म्हणजे शंभर यार्ड पळण्यासारखंच स्वारीला वाटतं कीं काय न कळे. मनोरम भाषा, व्यवहारिक उपमा, एकच प्रसंग थेटपर्यंत वर्णन करण्याची हातोटी अन त्याच प्रसंगाला अनुसरून निरनिराळे प्रसंग मधूनच सांगण्याची त्यांची पद्धत–खांडेकरांची असली पद्धत पाहिली म्हणजे मला एक आठवण होते—स्टेशनच्या आवारांत शिरतांना आगगाडी कितीतरी रूळ पटापट पोटांत गिळते पण शेवटीं कशी नेमकी अगदीं मुख्य रुळावर येऊन उभी राहते. खांडेकरांची कोणतीही गोष्ट वाचतांना मला हाच अनुभव येतो.

पण आमच्या सहाध्यायाने काढलेले ते उद्गार ऐकून मला वाटलें याला हें सर्व सांगितलें तरी....

माझें मन हळूंच हंसून गुणगुणलें " ...लागुळाची चव काय "

* * *

## मधे मधे

रविवारची सुटी होती म्हणून दुपारच्या वेळीं मी कागदाची रद्दी पाहत बसलों होतों. वर्तमानपत्रांचा व मासिकांचा ढीग माझ्यासमोर पडला होता. मी एकेक मासिक व मधून मधून वर्तमानपत्र चाळीत

होतों. दोनच मिनिटांनीं त्या ठिकाणीं विमल व कमल आल्या. माझ्या कामाच्या ' मधे मधे ' त्यांनीं लुडबुड करण्यास सुरुवात केली. प्रथम मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें, पण नंतर त्या फारच त्रास द्यावयाला लागल्यामुळें मी जरा ओरडूनच त्यांना सांगितलें—" ए पोरींनो, चूप बसा कशा—मधे मधे करूं नका. "

शहरांतील मोटारच्या पोंग्याचा, रस्त्यानें जाणाऱ्या-येणाऱ्या इसमांवर जितका परिणाम होतो, तेवढाच माझ्या त्या ओरडण्याचा त्यांचेवर परिणाम झाला.

मुलींच्या आईनें त्यांची बाजू घेतली—" करीनात का पोरी मधे मधे. जायचं तरी कुठं मग त्या पोरींनी. "

पत्नीची ती तरफदारी त्यावेळीं मला रुचली नाहीं. पण संध्याकाळीं जेव्हां मी व्हरांड्यांतील वेताच्या गोल खुर्चीवर एकटाच बसलों होतों तेव्हां मात्र पत्नीचें तें वाक्य मला वारंवार आठवूं लागलें— ' करीनात कां पोरी मधे मधे. '

मीं मनाशीं म्हटलें—जगांत मधे मधे केलेंच पाहिजे; नव्हे, मधे मधे गेलें पाहिजे. साधी घरांतीलच गोष्ट घ्या. आईला कामाचा डोंगर असतो. पण काम व आई यांच्या मधे मधे मुलांनी केलें तर आईच्या कामाचा डोंगर किती हलका होतो. तापाने फणफणणारा मनुष्य व औषधाची बाटली या दोघांच्या मधे जर कुणी पडलें नाही तर त्या दुखणाइताला आराम लवकर कसा पडेल ? त्या ठिकाणीं कुणीतरी मधे मधे करावयासच हवें. तसें करणारें जितकें जास्त निघतील तितका

आजाऱ्यांना आराम लवकर पडेल; एक तास एक दिवसाइतका लांब वाटणार नाहीं.

आयुष्यांत असे मधे मधे करावयाचे प्रसंग रोज हरघडी येत असतात. पण डोळे उघडे असूनहि आपण त्यांचेकडे डोळेझांक करतो. दारिद्र्य आणि दरिद्री मनुष्य या दोघांच्या तुम्ही मधे मधे करा. काय होतें तें पहा. दारिद्र्याचें दारिद्र्य अंशतः तरी दूर झालेंच पाहिजे. जड मोळीचें ओझें घेऊन जाणारी म्हातारी त्याच्या भारानं वांकून जाते, थकून जाते, तिची मोळी खालीं पडते. जर तुम्ही तेथे असला व त्या बाईच्या आणि त्या मोळीच्या मधे मधे केलें तर—लावा त्या मोळीला हात; नि ठेवा तिच्या डोक्यावर. पहा तुमच्या मधे मधे करण्यानें तिचें ओझें हलकें होतें कीं नाही !!

ग्रंथामध्यें ज्ञान असतें. अशा ग्रंथाचें ढीगच्या ढीग पडले आहेत. तें ज्ञान आपणांस लाभावें अशी इच्छा करणारे शेंकडों विद्यार्थी गर्दीनें उभे आहेत, पण त्या ढिगाच्या व गर्दीच्या मधे मधे कुणीतरी केल्याशिवाय तें त्यांना कधींतरी मिळेल काय? शक्य नाहीं. तेथें मधे मधे करणारे शिक्षक पाहिजेत, प्राध्यापक पाहिजेत आणखीन कितीतरी जण पाहिजेत. असे मधे करणारे नसले तर ग्रंथाचें ढीग जागचेजागींच राहतील. विद्यार्थ्यांची गर्दी वाढत जाईल, कुणीच कुणाजवळ येणार नाही.

पतिपत्नींच्या संसारांत मधे मधे करणारीं हीं मुलें आहेत म्हणूनच संसारांत माणसाच्या मनाला विरंगुळा वाटतो. तीं नसू द्या, संसाराचें वाळवंट झालेंच म्हणून समजा.

पारतंत्र्याचें जूं मानेवर असलेल्या राष्ट्रांतील देशभक्त मधे मधे करतात म्हणूनच कालांतरानें तें जूं फेकले जाते. मधे मधे करण्यानें हें केवढें मोठें कार्य साधतें.

लोक राज्यांतील सरकार व लोक या दोघांच्या मधे मधे करणारे निःस्पृह लोक नसतील तर सरकारचें काय म्हणणें आहे हें लोकांना आणि लोकांना काय पाहिजे हें सरकारला कधीं तरी कळेल कां ?

घर काय नि विश्व काय, " मधे मधे " करण्यावरच चाललें आहे, नाहीं कां ?

* * *

## मनोराज्य

परवां मी माझ्या एका मित्राकडे गेलों होतों. आरामखुर्चींत बसून तो खिडकींतून दूरवर कोठेंतरी पाहत होता. मी चपला वाजविल्या, पण स्वारीचें माझ्याकडे लक्षच गेलें नाहीं. आपल्या अस्तित्वाची त्याला जाणीव व्हावी म्हणून मी हातांतील छडी दारावर हळूंच आपटली. पण त्याही आवाजानें त्याची समाधि भंगली नाहीं. मग मी त्याच्या पाठीशीं उभा राहिलों अन् त्याला हांक मारली; तेव्हां कुठें त्याचें लक्ष माझ्याकडे गेलें.

मी विनोदानें म्हटलें, " लेका, कुठल्या एवढ्या मनोराज्यांत दंग होतास ? "

उत्तर देण्याऐवजीं माझ्याकडे पाहून तो नुसता हंसला. वाटले— मनोराज्यांत मनुष्य गुंग झाला म्हणजे त्याला आनंद होतो, हेंच ह्याचे हास्य आपणांस सांगत आहे.

माझा मित्रच कशाला, कुणीही मनोराज्य करण्यांत किती आनंद आहे हें सहज सांगूं शकेल. असलेल्या पैशापेक्षां अधिक पैसा कसा मिळेल या काळजीनें श्रीमंत दुःखी; तर पैसा नाहीं म्हणून गरीब दुःखी ! अशा या दुःखी माणसांनीं जग कसे भरलें आहे. पण हींच दुःखी माणसें एकदां मनोराज्यांत गुंग होऊं द्या, सुखाच्या राशी त्यांच्या उघड्या डोळ्यांना दिसतात. मनाच्या पतंगाला कल्पनेचा दोरा लावला म्हणजे, श्रीमंताला आपण अगणित पैसा मिळविला आहे असें वाटतें, आणि गरिबाला घटकाभर कुबेर झाल्याचा भास होतो. त्यांच्या मनोराज्यांत कोणताच चोर प्रवेश करीत नाहीं. कल्पनेच्या या साम्राज्यांत तो चक्रवर्ती असतो. मनुष्याला सुखाचा ठेवा फक्त मनोराज्यांतच मिळूं शकतो.

साधी मॅट्रिकच्या परिक्षेचीच गोष्ट घ्या ! त्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे मन मनोराज्यांत प्रवेशलें म्हणजे घटकाभर तो परीक्षा विसरतो. त्याच्यासमोर परीक्षेच्या निकालाचा कागद दिसतो. सुंदर अक्षरांत छापलेलें आपलें नांव दिसतें; आपण कॉलेजांत प्रवेश केला असेंही तो पाहतो. ते प्रोफेसर्स, झोकांत पोषाख केलेलें विद्यार्थी, रंगीबेरंगी साड्या नेसलेल्या त्या कॉलेज कुमारिका-कॉलेजच्या त्या मोकळ्या वातावरणांत त्याचें मन, मधाभोवतीं फिरणाऱ्या मधमाशीप्रमाणें, विहार करूं लागतें. पण परीक्षेकरितां, समोर वाचीत असलेल्या पुस्तकाकडे त्याचें लक्ष गेलें म्हणजे तो भानावर येतो. सत्याची त्याला जाणीव होते. मनोराज्य जर करतां आलें नसतें, तर ह्या क्षणैक सुखालाही तो आंचवला असता.

कॉलेजच्या आयुष्यांत एखाद्या मुलीशीं दहावीस मिनिटें बोलण्याचा आलेला प्रसंग म्हणजे मनोराज्याची मुहूर्तमेढच ठरते. तिच्या शब्दांच्या आवाजानें त्याच्या मनाला चांगलीच गति मिळते. तिच्याशीं तास तास गप्पा मारीत बसलेला तो स्वतःला पाहतो. तिनें दिलेल्या चहाच्या गोडीनें त्याच्या मनांत गोड विचार येतात. तिच्या साध्या पाहण्यांत त्याला प्रेम दिसतें. त्या प्रेमाच्या शिडीवरून तो इतका झप् झप् चढतो कीं आपल्या व तिच्या लग्नाच्या सनईचे मधुर स्वर देखील त्याच्या कानांत घुमूं लागतात. पण सनईऐवजीं कॉलेजच्या घंटीचा आवाज त्याच्या कानात खणखणला म्हणजे त्याच्या लक्षांत येतें आपण ज्या शिडीवरून चढून गेलों ती जमिनीवर टेकलीच नव्हती.

मनोराज्य हें असें आहे कीं, तें मिळविण्याकरितां लढाई करावी लागत नाहीं. कुणाची याचना करावी लागत नाहीं. एवढेंच नव्हे तर, आपणाला आपली जागा देखील सोडून हालावें लागत नाहीं. मनाचें तारूं कल्पनेच्या दर्यांत खुशाल सोडून द्यावें. परमेश्वर हाही मोठ्या कल्पक बुद्धीचा असला पाहिजे. मानवी जीवनांत त्यानें जिकडे तिकडे कष्टाचे कांटे पसरून दिले पण मनुष्याला मनोराज्यांत दंग करून त्यांतील एकही कांटा न बोचण्याची युक्ति त्यानेंच शोधून काढली.

काठीचा घोडा करून त्याला चाबकानें मारणारा मुलगा, किंवा बाहुलीला मुलगी कल्पून तिला फडक्यांच्या साड्या नेसविणारी मुलगी, हे दोघेहि मनोराज्यांत दंग असतात. त्यांना त्यावेळीं होणारा आनंद हा अवर्णनीय आहे. पूर्वीं राज्यावर फक्त राजाचीच सत्ता असे. पण

या राज्यावर आपली सर्वांचीच सत्ता आहे. आपण मात्र ती गाजविली पाहिजे, इतकेंच !

* * *

# तिसऱ्या वर्गाचा प्रवास

मनुष्याला आयुष्यांत जीं अनेक दिव्यें करावीं लागतात, त्यांपैकीं आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून प्रवास करणें हें एक आहे, असें मला स्वानुभवानें म्हणावेसें वाटतें. ईश्वराने निर्माण केलेल्या जगांत माणसाने दोन जगें निर्माण केलीं आहेत. एक श्रीमंतांचें आणि दुसरें गरिबांचें. आगगाडीचे डबे ज्याने शोधून काढले त्यानेहि त्या गाडींत तात्पुरते कां होईनात, पण दोन जगें निर्माण केलीं, हें निःसंशय. श्रीमंतांकरितां पहिल्या वर्गाचें, दुसऱ्या वर्गाचे डबे आणि आमच्यासारख्या गरिबांकरितां तिसऱ्या वर्गाचे डबे. थोड्या तासांच्या प्रवासाकरितां कां होईना पण त्याला हा फरक ठेवावासाच वाटला. आगगाडीचे डबे हे माणसांनीं भरलेले नसून जगांतील विषमतेनेंच भरलेलें आहेत असें मला म्हणावेसें वाटतें तें याच कारणाने !

आजकालच्या दिवसांत गाडीचें तिकीट मिळण्यापासून मारामार. बरें, तिकीट मिळालें म्हणजे गाडींत जागा मिळेल अशी शाश्वति नाहीं. आणि त्यांतल्या त्यांत तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत तर विचारूंच नका. त्या दिवशीं माझेंहि तसेंच झालें. तिकीट घेऊन मी प्लॅटफॉर्मवर गेलों. प्लॅटफॉर्म माणसांनी नुसता भरून गेला होता. आगगाडी आल्याबरोबर तिसऱ्या वर्गाच्या डब्यापाशीं खूप गर्दी झाली. डब्याच्या दारापाशीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

तर माणसांची खूपच झुंबड. मधमाशांच्या पोळ्याभोंवतीं हजारों माशांनीं जमावें तशीं माणसें त्या दारापाशी जमलीं होतीं.

त्या डब्याला निव्वळ धर्मशाळेचें स्वरूप आलें होतें. ज्यांना आंत जागा मिळाली ते इतरांना आंत येऊंच देत नव्हते. डब्यांत नुसता गोंगाट चालला होता; वर्गांत मास्तर नसले म्हणजे मुलांचा चाल-तोना–तसा !

पण या तिसऱ्या वर्गाच्या डब्याकडे तुम्ही जरा लक्षपूर्वक पाहा. तेथें शिकण्यासारख्या कितीतरी गोष्टी आहेत, हें तुम्हांस दिसून येईल. हा डबा म्हणजे एक छोटेसें जगच असतें. जगांत नित्य माणसें जन्मतात आणि मरतातहि. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत प्रत्येक स्टेशनवर यापेक्षां काय निराळें चालू असतें ? कित्येक उतरतात आणि कित्येक पुन्हा चढतात. पुन्हा नव्या ओळखी आणि लगेच परस्परांचा निरोप घेण्याची वेळ. समाजामध्यें हा स्पृश्य, हा अस्पृश्य हा भेद सांपडेल. पण या डब्यांत जातीपातीचा भेदभाव मुळींच नसतो. आपण डब्यांत पाणी कसें प्यावें व जेवावें किंवा नाहीं याचा कुणी विचार करीत बसत नाहीं. शिवाशिवीला तर लहानशा डब्यांत स्थानच नसतें. आपल्याजवळ जें आहे तें आपल्या सहप्रवाशाला देण्याला प्रत्येकाला आनंदच होतो. एखादा आपल्या चंचींतून पानतमाखू काढतो, तर लागलीच दुसरा आपल्या खिशांतून बिडीचें बंडल काढल्याशिवाय राहत नाहीं. तेथें ओळख असावी लागत नाहीं. ती आपोआप होते. आपला प्रवास हा केव्हा संपेल हें आपल्याला ठाऊक असलें तरी शेजारच्या प्रवाशाचा केव्हा संपेल हें कांहीं आपणांस माहीत नसतें.

या प्रवासावरून मानवी आयुष्याची क्षणभंगुरता किती चटकन पटते. एखादा भिकारी डब्याच्या कोपऱ्यांतून हळूंच आपली एकतारी छेडतो आणि सर्वांचें लक्ष आपल्याकडे वेधलें म्हणजे गाऊं लागतो— "कोण दिवस येइ कसा, कोण जाणितो ऽ ऽ"

बहुसंख्यांक श्रमजीवि वर्गावर जसें जग चालू आहे, तसेंच या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतील बहुसंख्यांक प्रवाशांच्या पैशांवर रेल्वे चालत आहे. श्रमजीवि वर्गाच्या दैन्याकडे जसें कुणी ढुंकूनही पहात नाहीं तसेंच या तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या सोयीगैरसोयींकडे कुणी पहात नाहीं. उन्हाळ्याच्या दिवसांत जणू त्यांना उष्मा होतच नाही अशी रेल्वेखात्याची खात्री असावी. तसें नसतें तर त्या डब्यांत विजेचे पंखे त्या खात्याने अवश्य ठेवले असते. त्या डब्यांतील ते असंख्य प्रवासी पाहून कोंडवाड्यांत कोंढलेल्या गुरांची आठवण होते. किती माणसांकरितां डबा आहे हें जरी लहानशा पाटीवर छापलें असलें तरी छापलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या नसतात याची साक्ष आपणाला तेथें पटल्यांवाचून रहात नाही.

हीं वैगुण्यें सोडलीं तर मला वाटतें कीं प्रवास करावा तर तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून करावा. तेथील तीं विविध प्रकारचीं माणसं, त्यांच्या त्या निरनिराळ्या भाषा त्यांचे ते तऱ्हेवाईक पोषाख, वागण्याच्या पद्धति एक ना दोन—

तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत वर्तमानपत्र वाचण्याची कांहीच आवश्यकता नसते. माणसाने फक्त आपले कान आणि डोळे उघडे ठेवावे आणि तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून खुशाल प्रवास करावा.

# तें सर्व आपणांपाशीं

माजघरांतील एका कोंपऱ्यांत टाकलेल्या अंथरुणावर अरुण निजला होता. त्याच्या गुबगुबीत अंगाला मी हळुहळू थोपटीत होतों. थोपटतां थोपटतां माझें लक्ष त्याच्या गोऱ्यापान गालाकडे गेलें.

‘ अरु ’—म्हणून मीं त्याच्या गालाचे पटापट पापे घेतले. त्याचे पापे घेतांना माझ्या मनांत आलें—अमृताच्या पेल्याला ओंठ लावला तरी असलें सुख मिळेल कीं नाहीं कोण जाणें ! मी त्याला पूर्ववत् थोपटूं लागलों. वाटलें-आपल्या मुलाला हळुहळूं थोपटण्यांतसुद्धां एक प्रकारचें सुखच नाहीं का.

‘ सुख ’—सुख हा शब्द उच्चारला कीं मला कित्येकांचे उद्गार आठवूं लागतात, इतकेंच नव्हे तर कांहीं व्यक्तीसुद्धां माझ्या नजरेसमोरून हलत नाहींत.

तत्त्वज्ञानी लोक काय म्हणतात किंवा तत्त्वज्ञान काय म्हणतें तें मला पुरतें ठाऊक नाहीं. कारण इंटरमध्यें असतांनाच Dictum de omni ला मी कंटाळलों होतों, नी त्यामुळें बी. ए. ला तत्त्वज्ञान हा विषय घेण्यास मी धजावलों नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं तत्त्वज्ञानी लोकांच्या मतें सुख हें जवाएवढें नी दुःख मात्र अपरंपार असावें. तत्त्वज्ञानीच कशाला पाहिजे, माझ्या पहाण्यांतल्या कित्येक व्यक्तींच्या बोलण्यांतसुद्धां कधीं कधीं एकच सूर निघतो.

दिवाळीच्या सुटींत मी असाच नागपूरला गेलों होतों. माझा एक मित्र मला तेथें भेटला. अगदीं सहकुटुंब चालली होती स्वारी. अवांतर

गप्पा झाल्यावर मीं त्याला विचारलें—' एकंदरींत मजेंत आहेस तूं ! "

मीं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें. एखादी वस्तु हरवली म्हणजे लहान मुलाचा चेहरा जसा होतो ना—त्याचा चेहराहि मला थोडाफार तसाच झालासें वाटलें.

मी रस्त्यानें जात होतों. चालतां चालतां मनांत त्या मित्राचें वाक्य सारखें घोळत होतें-- ' पण कशांत कांहीं सुख नाहीं ! '

सुख म्हणजे काय एखादी हरवलेली वस्तु आहे कीं ती शोधून सांपडेल ! आतां त्या मित्राचेंच पहाना. गृहस्थाला चांगली सरकारी नोकरी, आईबाप, बी. ए. झालेली बायको—

द्राक्षांच्या घोसाकरितां उड्या मारणारा कोल्हा, पाय उंच उंच करून एखादी वस्तु घेण्याकरितां धडपडणारें मूल—अप्राप्य वस्तुकरितां धडधडणाऱ्या लोकांची स्थितीहि थोडी फार त्या कोल्ह्यासारखी किंवा लहान मुलासारखी होते असें म्हटल्यास चूक होणार नाहीं. आहे त्या गोष्टींत सुख मानून घेणें यासारखें सुख नाहीं. परंतु मनुष्य स्वभाव या गोष्टीला अपवाद असावा, नाहीं तर—

' कशांतच कांहीं सुख नाहीं-- ' असें क्षणोक्षणीं म्हणणारे आपणांस आढळले नसते. पण कशांत कांहीं सुख नाहीं याच्या उलट असेंहि म्हणतां येईल कीं, सुख नाहीं कशांत ?

स्वतःच्या बाळसेदार मुलाला थोपटण्यांतसुद्धां एक प्रकारचें सुखच नाहीं का ? एखाद्या मैत्रिणीबरोबर चांदण्यांत फिरायला जाण्यांत सुख नाहीं असा कोणता तरुण म्हणेल ?

सुख म्हणजे अगदीं अध्यात्मापासून मिळणारें किंवा जग हें नश्वर आहे, संसार हा दुःखांनीं भरलेला आहे असें सांगून सर्वसंगपरित्याग करावयास लावणारे संत—आपणांस त्यांच्या दृष्टीनें याचा विचार करावयाचा नाहीं. परंतु अशा कित्येक गोष्टी आहेत कीं त्यांच्यापासून थोडी ना थोडी तरी सुखाची प्राप्ति करून घेतां येते. करून घेतां येते असें म्हणण्यापेक्षां त्या गोष्टीपासून आपणांला सुख मिळूं शकतें असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. समाधानासारखें सुख दुसरें कोणतेंच नसावें.

सुंदर मुखाच्या स्त्रीकडे सावें पहाणें यांत सुख असतें किंवा नाहीं हें एखाद्या पंचविशीच्या तरुणाला विचारा; लगेच त्याच्या मुखावर स्मिताचें समाधान दिसतें कीं नाहीं तें पहा. ज्याला आपण इंग्रजींत Pleasure म्हणतों तें साध्या दोन तासांचा एखादा चित्रपट पाहूनसुद्धां मिळवितां येतें, हा अनुभव कुणाला नाहीं. अर्थात् सुख याचा अर्थ चैन किंवा मजा असा घेतल्यास तो मात्र चुकीचा होईल हें निश्चित.

सुख ही गोष्ट कुणालाहि अंगुलीनिर्देश करून दिग्दर्शन करतां येणार नाहीं. एखाद्या मनुष्याचे दृष्टीनें जें सुख असेल तें दुसऱ्याच्या दृष्टीला सुखच वाटेल असें नाहीं. एखादें निसर्गाचें सुंदर चित्र रंगवितांना रंगून जाणारा चित्रकार कित्येकांच्या दृष्टीनें वेडा ठरेल पण त्या चित्रकाराला जाऊन विचारा, तो नुसता हंसेल. हास्याच्या द्वारां तो आपणाला हेंच सुचवील कीं--चित्र काढतांना तर मला स्वर्गसुखाचा अनुभव मिळतो.

दारिद्य हीच जिची मैत्रीण आहे अशा एखाद्या मातेला सुख म्हणजे काय याची तोंड ओळखसुद्धां नसेल, पण तेंच तिचा लहानगा पदरा-आड पडून स्तनपान करीत असतांना तिच्या चेहऱ्याकडे पहा; चेहऱ्यावरचा अर्थ ज्याला ओळखतां येतो तो म्हणेल–ही बाई फारच सुखांत असली पाहिजे !

स्वतःच्या मिळकतींतील रुपया दोन रुपये बहिणीला ओवाळणी म्हणून घालण्यांत सुख नाहीं असें कोणत्या भावाला वाटेल बरें ? इतकेंच काय पण साधी पत्रांचीच गोष्ट घ्याना, आपल्या मित्रांचीं अगर मैत्रिणींचीं साधी पत्रें वाचण्यांत सुद्धां किती अपूर्व समाधान लाभतें.

वाचनाची गोडी असलेल्याला खांडेकरांच्या गोष्टी वाचतांना तरी कोणता निराळा अनुभव आहे !

कस्तुरीच्या सुवासानें धांवत सुटणाऱ्या मृगाला आपल्याच नाभींत कस्तुरी आहे याची जाणीव नसावी...

सुखाच्या मागें लागलेल्या लोकांची स्थिति देखील त्या मृगासारखीच होते, नाहीं का ? आपलं सुख आपणापाशीं आहे याची जाणीव जर आपणाला असती तर--

तर 'सुख आणि समाधान' यांच्या नांवानें आपण निःश्वासच सोडतो ना !

* * *

## संयम

रोज संध्याळाकीं फिरायला जायचं असा आमचा नियम असे. नेहमीप्रमाणें त्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही फिरून घराकडे येत होतों.

ज्या रस्त्यानें आम्ही येत होतों, त्या रस्त्याला बराच उतार होता. त्या उताराने एक सायकल झपाट्याने येत होती. आधीच उतार आणि त्यांत पुन्हा तो सायकलस्वार पडेल मारीत होता; त्यामुळे सायकलला चांगलीच गति मिळाली. एवढ्यांत काय गंमत झाली पहा; त्या रस्त्याने एक वासरूं आडवें जाऊं लागलें. आम्हाला सर्वांना वाटलें–आता ही सायकल नेमकी त्या वासरावर जाऊन आदळणार. तसें कांही होऊं नये म्हणूनच कीं काय आमच्यांतला एकजण ओरडला, "ब्रेक लावा ताबा ठेवा, संयम राखा.

सायकलस्वाराने सायकलला एकदम ब्रेक लावला, म्हणूनच पुढील अनर्थ टळला. नाहीतर-नाहीतर काय, सायकलवाला चांगलाच आद-ळला असता. एवढा अनर्थ टळण्याचें कारण एकच--त्याने सायकलला ब्रेक लावण्यांत संयम दाखविला.

आम्ही चाललोंच होतों. पण माझ्या मनांत मात्र तो सायकलस्वार राहून राहून डोकावीत होता. त्याच्या सायकलचा अपघात टळण्याचें कारण त्याने वेळींच ठेवलेला संयम हें होतें. सायकलचीच गोष्ट कशाला पाहिजे ? आपल्या नित्याच्या व्यवहारांतसुद्धां आपण हरघडी होणाऱ्या गोष्टींना वेळींच जर संयमाने आळा घातला तर कितीतरी अनर्थ टळतील. मला एक गृहस्थ माहीत आहेत. ते चांगले श्रीमंत होते. स्वभावाने मोठे दिलदार. पैशाकडे पाहण्याची त्यांची वृत्तीच नव्हती. 'शिताभोंवती भुतें' या न्यायानं, त्यांच्या सभोवार मित्र असत. मित्रांकरितां वाटेल तसा खर्च करीत. खूप पैसा खर्च करणें हें मोठेपणाचें लक्षण आहे असें त्यांना वाटे. अन् शेवटीं परिणाम

व्हावयाचा तोच झाला. ते कर्जबाजारी बनले. ही आपत्ती त्यांना सहज टाळतां आली असती. पण केव्हा, जर त्यांनी वेळींच संयम ठेवला असता तेव्हा !

माझ्या मनांत आलें-- त्या सायकलवाल्याने खरोखरीच शहाणपणा केला. वेळींच त्याला बुद्धि सुचली. आणि अशी बुद्धि ज्याला त्याला सुचली पाहिजे. ' संयम ' किती अर्थपूर्ण शब्द आहे हा !

आपल्या नित्याच्या आयुष्यांतसुद्धां आपण हा शब्द विसरतां कामा नये. एखाद्या शिक्षकाला विद्यार्थ्याचा खूप राग येतो. रागाच्या सपाट्यांत तो विद्यार्थ्याला मारावयास मागें पुढें पाहत नाहीं. पण त्या विद्यार्थ्याला मारण्यापूर्वी जर त्याने संयम राखला तर कितीतरी अनिष्ट परिणाम टळतील ! शिक्षकानेंच काय, पण ज्या व्यक्तीशीं आपला संबंध येतो, त्या त्या व्यक्तीशीं वागतांना आपण आपल्या विकारांवर संयमच ठेवला पाहिजे. असें संयमाचें व्रत जो शिकेल तोच आयुष्यांत यशस्वी होईल.

सामान घेण्याऐवजी एखाद्या गिऱ्हाइकाने मालाचा नुसता भावच विचारण्याचा सपाटा लावला म्हणजे दुकानदारानें त्याच्यावर न रागावतां आपल्या रागावर संयम ठेवला पाहिजे. जो दुकानदार संयम ठेवतो, त्याला यश हें मिळालेंच पाहिजे. पत्नीने पतीशी किंवा पतीने पत्नीशीं वागतांना संयमच ठेवावा लागतो. संसारांत सुख मिळण्याचें तें एक उत्तम साधन आहे.

महात्मा गांधी, पं जवाहरलाल नेहरू या असामान्य व्यक्तींनी संयमाचें शास्त्र चांगलेंच अवगत केलें. नाहीतर त्यांच्यावर टीका

करणाऱ्या अगर त्यांच्या मोटारीवर दगड फेकणाऱ्यांचा त्यांना मनस्वी संताप आला असता. पण तसा ते येऊं देत नाहींत. त्यांचें मर्म त्यांच्या ' संयमां 'तच आहे. नाहीं का ?

## आंधळी कोशिंबीर

नगर वाचनालयांतून बाहेर पडल्यावर मी जोशी मार्केटसमोर आलों असेन. रस्त्यावर बरीच गर्दी होती. सिनेमा सुरू होण्याची वेळ असल्यामुळें रस्त्यावर गर्दी होणें स्वाभाविकच होतें. रस्त्यावरच्या त्या गर्दीतून एक मोठा आवाज माझ्या कानीं आला, " खुशाल अंगावर येतो, आंधळा आहेस काय ? "

मी मोठ्या उत्सुकतेने काय आहे हें पाहण्याकरितां रस्त्याच्या थोडा बाजूला झालों. मग मात्र माझ्यानें हसल्याशिवाय राहवलें नाहीं. कारण ज्याला उद्देशून तें वाक्य म्हटलें होतें तो मनुष्य खरोखरीच आंधळा होता. आमच्या निळकंठराव देशपांड्यांचा आंधळा भाऊ नित्याप्रमाणें काठी टेकवीत टेकवीत रस्त्याने चालला होता.

माझीं पावलें घराकडे वळलीं; पण माझे मन मात्र तें वाक्य एखाद्या श्लोकाप्रमाणें म्हणत होतें, " आंधळा आहेस काय ? "

तो रस्त्याने जाणारा खरोखरीच जन्मांध होता; पण त्याच्याप्रमाणे, डोळे असून, जाणून बुजून आंधळे असणारे लोक काय थोडे आहेत ? स्वतःच्या मुलाच्या जन्मापासून त्याच्या खस्ता आईबाप खातात, पण त्याच आईबापांकडे आंधळ्या नजरेने पहाणारे लोक आपणांत किती-



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि: ..........
क्रमांक..........

तरी असतील. डोळे असून त्यांच्याकडे डोळेझाक करणारे आपण मोजूं लागलों तर हाताचींच काय, पण पायाचींसुद्धां बोटें पुरणार नाहींत.

" काळाबाजार करूं नका, गरिबांची पिळवणूक होऊं देऊं नका, " असें पं. जवाहरलाल नेहरूंपासून प्रत्येक गांवांतील पुढाऱ्यापर्यंत सर्व सांगतात. लोक अगदीं उघड्या कानांनीं ऐकतात. त्यांच्या कानांत कुठलाहि दोष नसतो. पण एवढें ऐकूनहि काळाबाजार थांबल्याचें कुणाच्या दृष्टीस पडत नाहीं. आणि पडणार तरी कसें ? पैशाच्या अभिलाषेने आणि ऐश्वर्याच्या हावेने त्यांचे डोळे आंधळे झाले असतातना ! डोळसांपेक्षा आंधळ्यांचीच संख्या जास्त आहे. जोपर्यंत हे आंधळे डोळस होत नाहीत, तोपर्यंत इतर डोळसांना आपल्या डोळ्यांनी सुखाचे दिवस दिसणें शक्य नाहीं. जन्मांधांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया यशस्वी होत नाहीं हें खरें असलें तरी असल्या या आंधळ्यांवर शस्त्र-क्रिया यशस्वी होऊं शकणार नाहीं हें कसें बरें होईल ?

धर्माच्या बाबतींत तरी कोणती निराळी स्थिति आहे ? पूर्वापार चालत आलेल्या रूढी आणि परंपरा यत्किंचितहि न सोडणारा वर्ग अजूनहि संख्येनें कांहीं कमी नाहीं. जोपर्यंत त्यांचा हा रूढीला नी परंपरेला चिकटून राहण्याचा आंधळेपणा कायम आहे, तोपर्यंत ते असेंच चालणार. ज्या ठिकाणीं नको त्या ठिकाणीं तो आपणांस प्रत्यहीं पाहावयास सांपडतो. आणि या आंधळेपणामुळें व तो पत्करणाऱ्या आंधळ्यांमुळे जिकडे तिकडे एकच खेळ चाललेला दिसतो, ' आंधळी कोशिंबीर. '

शाळेंतल्या जगांत तोच प्रकार. शिक्षकांनी कितीहि सांगितलें तरी विद्यार्थी पुनःपुन्हा चुका करीतच असतात. मग त्या आंधळेपणाने का होईनात ! विद्यार्थ्यांचीच गोष्ट कशाला ? शिक्षकाचे प्रश्न जेव्हा जेव्हा पुढें येतात, तेव्हा तेव्हा, जो तो एकच काढा पाजीत सुटतो. "स्वार्थत्याग करा. शिक्षणक्षेत्रांत तरी पक्षोपपक्ष नकोत; शिक्षकांच्या असमाधानाने हें क्षेत्र तरी नासायला नको." उन्हाळ्यांत दूध नासायला त्यांत मिठाचा खडा टाकावा लागत नाहीं. बाहेरच्या तीव्र ऊष्णतेने तें आपोआपच नासतें. शिक्षकांनीं शिक्षणक्षेत्र, स्वतःच्या असमाधानी वृत्तींमुळें जरी दूषित केलें नाहीं तरी तें महर्गतेच्या उष्णतेने करपून, गेल्याशिवाय कसें राहील, हें या उपदेशकांच्या लक्षांतच येत नसावें. आंधळ्याने रस्ता दाखविण्यांतलाच तो एक प्रकार होतो. हे उपदेशक जर उघड्या डोळ्यांनी शिक्षकांच्या संसाराचें स्पष्ट व खरें चित्र पाहतील तर तें किती भयानक आहे हें त्यांना दिसून येईल. आणि हें चित्र इतकें भयानक आहे कीं त्यांना तें पुन्हा पाहावेसेंसुद्धां वाटणार नाहीं.

डोळे असून आंधळे असणाऱ्यांची स्थिति ही अशीच असतें. पति व्यसनी असला, छळवादी असला, तरी त्यावर अतुल प्रेम करणारी पत्नी विरळा नसते; पण तिच्या प्रेमाला दिव्य दृष्टीच आलेली नसते. जोपर्यंत तिचें प्रेम आंधळें आहे, तोपर्यंत ती आयुष्यभर एखाद्या आंधळ्यासारखी ठेचाळत ठेचाळत आयुष्याचा मार्ग आक्रमिणार. आंधळ्याच्या काठीचीसुद्धां जागा तिचा पति तिच्या आयुष्यांत घेऊं शकणार नाहीं.

गोंदियाच्या साहित्यसंमेलनांत मी 'आंधळ्यांची शाळा' हें नाटक पाहिले. त्या नाटकाकडे पाहतांना माझ्या मनांत एकच गोष्ट आली

जग ही एक रंगभूमि आहे असें म्हणतात. जगाच्या या रंगभूमीवर एकच नाटक सतत चालू आहे. त्याचें नांव ' आंधळी कोशिंबीर. '

## पोषाख

चित्रविचित्रता मोठ्या प्रमाणांत जर कोठें सांपडत असेल तर ती आपल्या या भारतांत. येथें सर्व प्रकारची विविधता आहे. जगांतील सर्व धर्म आणि पंथ येथें पाहावयास मिळतात. दोनशेंच्या वर जाती. कुठें असतील तर आपल्याच देशांत. तितक्याच भाषा बोलणारे लोक आहेत. प्रत्येकाचे आचार निराळे. त्याचप्रमाणें पोषाखाच्या पद्धतींतहि फरक आहेत. दोन बोटाच्या लंगोटीपासून तों, डोक्यापासून पाऊल झाकणारा पडद्याचा पोषाख परिधान करणारे आपल्या या देशांत आहेत.

पोषाखाच्या पद्धतींतील प्रकार हा चंद्रकलेप्रमाणें वारंवार बदलणारा आहे. माणसाची प्रतिष्ठा त्याच्या पोषाखावर अवलंबून असते, असें कांहीं लोकांना वाटतें. विवक्षित धंदा करणाऱ्या लोकांनी विशिष्ट प्रकारचाच पोषाख करावा असा त्यांचा कटाक्ष असतो. माणसाचा मोठेपणा किंवा प्रतिष्ठा ही त्याच्या पोषाखावर अवलंबून नसते. एखादा अप्-टु-डेट् पोशाख केलेला मनुष्य हळूच दुसऱ्याचे खिसे कापतोच किनई. वरून इस्त्रीचे स्वच्छ कपडे घालणारा व हातांत चांदीची मूठ असलेली काठी बाळगणारा एखादा व्यापारी भर दिवसां अवाच्या-सवा भाव घेऊन माणुसकीचा खून करतोच ना ! पोषाखावर माणसाची योग्यता असती तर वरील दोन्ही प्रकारचे लोक श्रेष्ठच आहेत, असें म्हणावें लागेल.

महात्मा गांधींची हंसरी मूर्ति ज्यांना डोळ्यांसमोर अजूनहि दिसते त्यांना विचारा ते हेंच सांगतील कीं बाबांनो, मनुष्याचें कर्तृत्व, त्याचा मोठेपणा, हा त्याच्या पोषाखावर अवलंबून नसतो; तर त्याच्या कृतीवर असतो.

" वेष असावा बावळा, परि अंतरीं असाव्या नाना कळा, " असें सांगणाऱ्या कवीचा उद्देश तरी दुसरा कोणता आहे ? पोषाख ही जगाला दाखवावयाची वस्तू आहे; ही अगदी वरवर दिसणारी गोष्ट आहे. वरच्या गोष्टींना जग भुलेल, फसेल. पण त्या पोषाखाच्या आंत असणारें ' मन ' कसें आहे हें जगाला दिसूं द्या. तुमचें मन स्वच्छ असूं द्या. तें तसें असेल तर पोषाख कसाहि असला तरी चालेल.

पाठीवर वेण्यांचे शेपटे, डोक्याला उंची तेलें, सुबक पातळें, अशा तऱ्हेचा तरुणींचा घोळका पाहिला म्हणजे तरुणांचें लक्ष सहजच तिकडे जातें. गुलाबाच्या ताटव्याजवळून आपण जात आहोंत असें त्यांना वाटेल. पण या गुलाबाच्या ताटव्याला भयंकर कांटेहि असतात याची आठवण कुणाला राहत नाहीं. असा सुंदर पोषाख करणाऱ्या मुली सुंदर स्वभावाच्या असतील हें कुणी सांगावें ? स्वच्छ पोषाखाबरोबर मनेंहि शुद्ध ठेवावीं.

तुमचा पोषाख कसाहि असूं द्या पण तुमचे विचार उच्च असूं द्या. पोषाखावर वळी असली तरी हरकत नाहीं, पण कपाळावर तिरस्कार आणि संतापाची आठी नसूं द्या. पोषाखांत थोडी मलीनता खपेल पण अंतःकरण मात्र कुविचाराने, द्वेषाने मळूं देऊं नका. त्यांत गढूळपणा आणूं नका. अहमहमिका ही पोषाखांत नसावी, ती विद्यार्जनांत असावी.

स्त्रियांचें सौंदर्य पोषाखानें खुलत असलें, तरी पुरुषांचें मात्र त्याने खुलत नाहीं. पुरुषांचें सौंदर्य विद्वत्तेने खुलतें; ज्ञानानें खुलते पोषाखाने सौंदर्य खुलवितां आलें तरी त्याने आपल्या दोषांवर पांघरूण घालतां येत नाहीं हेंच खरें.

* * *

## नाद

आमच्या शेजारीं राहणाऱ्या इंदिराबाईंची आपल्या मुलाच्या बाबतींत एक सतत कुरकुर असते. त्यांच्या मुलाने एखादी गोष्ट मागण्याचा सपाटा चालविला म्हणजे त्या म्हणतात, "मुलखाचा नादी आहे कारटा."

त्यांच्या तोंडचें तें वाक्य ऐकलें म्हणजे मला हसूं येतें. मला वाटतें त्यांनी केलेल्या शब्दाची योजना किती चुकीची आहे. "कारटा नादी आहे असें म्हणण्याऐवजीं, कारटा हट्टी आहे," असें त्यांनी म्हणावयास हवें. नाद आणि हट्ट या शब्दांत अर्थाच्या दृष्टीने फार फरक आहे, नाहीं का ?

नाद म्हणजे आवड, नव्हे, नाद म्हणजे छंद आपल्या आवडीचा एखादा विषय असला म्हणजे त्याचा अभ्यास करण्याचा आपल्याला नाद लागतो. युरोपांतील 'गॉल्फियर' बंधूंना कागदाच्या पिशवींत धूर भरून त्या हवेंत कशा उडत राहतील हें पाहण्याचा नाद लागला, आणि त्यांच्या या नादांतूनच हल्ली आपण जीं विमानें पाहतों त्यांचा जन्म झाला.

मनुष्याला जर कोणत्याहि गोष्टींत यश मिळवावयाचें असेल तर त्याला त्या गोष्टीचा नादच लागला पाहिजे. मनांतून हौस निर्माण

झाली पाहिजे. इतकेंच नव्हे, तर त्याला त्या गोष्टीकरिता एक प्रकारचें 'वेड' लागलें पाहिजे. एखाद्या गोष्टीकरितां जोपर्यंत आपण वेडे होत नाहीं, तोपर्यंत त्या गोष्टींत आपल्याला पारंगतता मिळूंच शकणार नाहीं. डॉ. सिम्सन् यांना निरनिराळीं द्रव्यें तपासून पाहण्याचा असाच नाद लागला होता. आणि त्यांना तो तसा नाद लागला म्हणूनच ते क्लोरोफॉर्मसारख्या उपयुक्त वस्तूचा शोध लावूं शकले. इंग्लंडमधील जेम्स वॅट यांचेंहि उदाहरण असल्याच प्रकारचें आहे. उकळत्या पाण्यावरील किटलीचें उडणारें झांकण पुनः पुन्हा पाहण्याचा त्यांना इतका नाद लागला कीं त्याचें पर्यवसान वाफेच्या शक्तीच्या साह्यानें चालणाऱ्या आगगाडीच्या इंजिनांत झालें. इटलीचा नामवंत शास्त्रज्ञ मार्कोनी याची स्थिति तशीच झाली होती. बिनतारी संदेश घेण्याच्या त्याच्या नादाच्या पोटींच रेडिओचा जन्म झाला.

एखाद्याला नाद लागला म्हणजे त्याला त्याच्याशिवाय दुसरें कशाचेंच भान राहत नाहीं. अन् तसें त्याला तें राहूं सुद्धां नये. नाद हा मनुष्याला परमेश्वरानें दिलेला एक वर आहे. वर मिळालेल्याचें जसें अंतिम कल्याण होतें, तसेंच नाद लागलेल्या माणसाचा शेवटीं फायदाच होतो. त्याच्या हातून अशी एखादी कृति निर्माण होते कीं त्यामुळें त्याची कीर्ति अजरामर होऊन जाते. एखाद्या गोष्टींच्या नादांत मनुष्याला खाणेंपिणेंहि सूचत नाहीं. तो स्वतःला पूर्णपणें विसरतो. परमेश्वराच्या दर्शनाचा व भक्तीचा श्री तुकाराम महाराजांना असाच नाद लागला होता. त्यांची 'नाद ब्रह्मी टाळी' लागली. त्यांना मोक्षप्राप्ति झाली.

दा. क्र. १०(७)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

सामान्य माणसांना सुद्धां कांहीं नाद असतातच कीं ! कित्येकांना वाचनाचा नाद असतो. तर कित्येकांना लिहिण्याच्या नादांत कांहींच सुचत नाहीं. स्वतःच्या घराभोंवतीं छोटासा बाग करून फुलझाडांना पाणी घालण्याचा नाद तर कितीतरी जणांना असतो.

नादापासून एक फार मोठा फायदा आहे. नादाच्या भरांत माणसाला स्वतःच्या दुःखांचा किती लवकर विसर पडतो, त्याला एका अनुपम अशा आनंदाचा लाभ मिळतो. त्याची तुलना कशाशीच करतां येणें शक्य नाहीं. तो प्रत्येकाने अनुभवावा लागतो.

आपला देश स्वतंत्र असावा असें प्रत्येकाला तर वाटतेंच. पण तो स्वतंत्र करण्याकरितां प्रयत्न करावयाचा नाद मात्र फार थोड्यांना लागतो. स्वातंत्र्याचें वेड लागल्याशिवाय स्वातंत्र्य मिळत नाहीं. तें वेड ज्यांना लागतें ते लोक, लोकांच्या दृष्टीने वेडे ठरतात. पण अशा वेड्यांमधूनच ग्यारिबॉल्डी, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू या सारखे वीर निर्माण होतात. हें विसरतां येणार नाहीं. आणि अशा ' वेड्या ' वीरांच्या हातूनच स्वातंत्र्य संपादनासारखें महत्त्वाचें कार्य होऊं शकतें.

* * *

## शब्द

शाळेमधे असतांना मी ' स्वामिनिष्ठा ' नांवाचा एक धडा वाचला होता. त्या धड्यांतील शेवटचें वाक्य अजूनहि मला आठवतें. तें वाक्य असें होतें–" बाजीप्रभूची स्वामिनिष्ठा इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिली

जाईल. धन्य तो बाजीप्रभू, आणि धन्य त्याची स्वामीनिष्ठा !" बाजीप्रभूची स्वामिनिष्ठा तीव्र होती म्हणूनच त्याने छातीचा कोट करून त्यावर गोळी झेलली, ही गोष्ट खरी आहे. पण स्वामिनिष्ठेपेक्षां दिलेल्या शब्दालाच त्याने प्राणाची किंमत दिली, नाहीं कां? "दिलेल्या शब्दाची" महती किती आहे हें बाजीप्रभूने स्वतःच्या उदाहरणावरून जगाला दाखवून दिलें.

शब्दांचीच महती तशी आहे. जगांत आपल्याला निरनिराळ्या विस्मयकारक गोष्टी दिसतात. पण सर्वांपेक्षां शब्दांची जादू कांहीं औरच असते. लेखक साधे शब्दच लिहितो पण ते शब्द आपणांला निरनिराळे रस अनुभवण्याची संधि देतात. तोफेची शक्ति, बॉंबची स्फोटकता, विमानांची गति, पाणबुड्यांची विध्वंसकता, एक ना दोन—

पण या सर्व गोष्टी एकत्रित करूनहि जेवढी शक्ति निर्माण होणार नाहीं, तेवढी शक्ति साध्या 'शब्दांत' असते. तशीं ती नसती तर रुसोच्या लेखांतील शब्दांनी फ्रेंच राज्यक्रांतीच झाली नसती. मनुष्याच्या अंतःकरणांतील शौर्य, बंदुकी व तोफा पाहून जेवढें जागृत होत नसेल त्याच्यापेक्षां कितीतरी पट तें सेनापतीच्या तोंडच्या चार शब्दांनी जागृत होतें. काव्यांतील शब्दांची जादू तर त्याहूनहि जास्तच. रणांगणावर होणाऱ्या तोफांच्या आवाजापेक्षां तेथें होणाऱ्या रणगीतांतील शब्दांनी योद्ध्यांना कितीतरी उत्साह येतो. शब्द हे दारूसारखेच असतात. शब्दाने शब्द वाढत गेला म्हणजे राष्ट्राराष्ट्रांत युद्धें झालेलीं आपण इतिहासांत वाचतोंच ना !

शब्द हे अग्निस्फुलिंगाप्रमाणेंच आहेत. एवढेंच नव्हें तर त्यांना कट्यारीची धार असते असें म्हटलें तरी तें चुकीचें होणार नाहीं. कटु शब्द याची साक्ष आपणांला उत्तम देतात. इंग्रजींतसुद्धां असें म्हटलें आहे, " Curt words hurt more than a cruel steel "

माणसाच्या मनाचे जसे दोन प्रकार आहेत, तसेंच शब्दांत दोन प्रकार असतात. कटु शब्दांत माणसाचे डोळे इंगळीसारखे लाल करण्याची जशी शक्ति असते, तसेंच त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु गाळण्याची शक्ति प्रेमळ व सहानुभूतीच्या शब्दांत नसतें हें कोणासहि नाकबूल करून चालावयाचें नाहीं.

चांदीचे कितीही रुपये मोजले तरी " शब्दाची किंमत " होत नाहीं, ती तशी करतां आली असती तर बाजी प्रभू, तानाजी, गॅलिलिओ. सॉक्रेटिस यांच्यासारख्यांचीं नांवें अजरामरच झालीं नसतीं.

पण शब्दांची किंमत न कळणारे लोक आपल्यांत थोडे का आहेत? " पांच मिनिटांत येतो, " असें म्हणून पन्नास मिनिटें लावणारे लोक नित्य आपल्या पाहण्यांत येतातच. आपण दिलेला शब्द सुपारीची चिमूट देण्यासारखाच पुष्कळांना वाटतो. शब्दांनी माणसें जोडतां येतात आणि तोडतांहि पण येतात.

भावार्थ-दीपिका लिहून ज्यांनी मराठी वाङ्मय अमर करून ठेवलें, त्या श्री ज्ञानेश्वर महाराजांनीसुद्धां म्हटलें आहे, " माझा मऱ्हाटाचि बोल कवतुकें, परी अमृतातेंहि पैजा जिंके, ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन. " यावरून शब्दांची महती किती आहे हें स्पष्ट दिसून येतें.

" शब्द देणें, " " शब्द टाकणें, " "शब्दाची किंमत," "शब्दानें शब्द वाढविणें, " " शब्दावर विश्वास ठेवणें " इत्यादि वाक्प्रचार शब्दाच्या महतीमुळेंच मराठी भाषेंत रूढ झाले.

मला जर कुणी विचारलें कीं जगांत सर्वांत जास्त किंमत कशाला आहे, तर मी त्याला एकच उत्तर देईन, " शब्दाला. "

* * *

## आजची कला

त्या दिवशीं मी व माझा एक मित्र चित्रकलाप्रदर्शन पहावयास गेलों होतों. एकापेक्षां एक सरस व सुंदर चित्रें पाहून आमचीं मनें तर कशीं थक्क होऊन गेलीं. एका चित्राजवळ आम्ही उभे राहिलों. चित्र इतकें सुंदर होतें कीं पहातच बसावें असें वाटलें. पाय तेथून उचलेतनाच. रावण सीतेला पळवून नेत होता ; या प्रसंगावर तें चित्र काढलें होतें. रावणाच्या चेहऱ्यावर जेवढा आसुरी आनंद दाखविण्यांत चित्रकाराने आपली 'कला' दाखविली होती, त्यापेक्षा कितीतरी पटीने सीतेच्या मुखावरील कारुण्य दाखविण्यात त्याची 'कला' दिसून येत होती.

चित्रावरची खिळलेली दृष्टि तशीच ठेवून माझा मित्र म्हणाला, " बाळ, याला म्हणतात कला ! सुंदर. "

' हं ' म्हणून मी त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

प्रदर्शन पाहून परततांना माझा मित्र मला म्हणाला, " खरंच. मनुष्याला एखादी तरी 'कला' आली पाहिजे. गायन, वादन, लेखन—

कोणतीहि एखादी पाहिजे रे, आपलं जीवन अगदी निरर्थक. आपल्याला एकहि कला येत नाहीं. कसलं हें आयुष्य—"

त्या दिवशीं रात्रीं जेव्हां मी झोपावयास म्हणून बिछान्यावर पडलों, तेव्हा माझ्या मित्राचें तें वाक्य नेमकें मला आठवत होतें—मनुष्याला एखादी तरी ' कला ' आली पाहिजे.

मला स्वतःशींच हंसू आलें-आपल्याला कला येत नाहीं हें माझ्या मित्राचें वाटणें किती चुकीचें आहे. प्रत्येक मनुष्याला ' कला ' येते. निदान आजच्या जगांत तरी पुष्कळांना एक ' कला ' चांगलीच अवगत आहे. ती म्हणजे, ' खोटें बोलण्याची. '

आपल्या दैनंदिन व्यवहारांत असे ' कलाकार, कितीतरी दिसतील. चला कोणत्याहि दुकानांत. दुकानदाराच्या तोंडून, " सच्चा भाव और सच्चा माल, " हें वाक्य कितीदां तरी बाहेर पडतें. पण सच्चा भाव सांगणारा व सच्चा माल देणारा एकतरी दुकानदार आपणांस आढळेल काय ? खोटं बोलण्याची ही ' कला ' त्यांनी किती आत्मसात केलेली असते ! जी गोष्ट दुकानदारांची तीच इतरांची.

लहान मुलाला हवी असलेली वस्तु, " मी आज आणीन, " म्हणून रोज वचन देणारे ' बाप ' एका दृष्टीनें सराईत कलाकारच नाहींत काय ? मुलाला आवडणारा पदार्थ, " उद्यां करीन " असें म्हणणारी ' आई ' ही खोटं बोलण्याच्या कलेंत पारंगत नाहीं असें म्हणण्याची कोणत्या तरी आईची हिंमत होईल काय ?

कोणतीहि गोष्ट करावयाची नसली तरी ती " उद्यापासून करूं " असें म्हणणारें या कलेंत चांगलेंच निपुण असतात, असेंच म्हणावें लागेल.

अमक्या पेठेंतला " रस्ता दुरुस्त करा " अशी विनंती नगरपित्याला नागरिक करतात. त्यांच्या सूचनेचें तो नगरपिता सुहास्य वदनाने स्वागत करतो. " पुढच्या अंदाजपत्रकांत " त्याची तरतूद केल्याची हमी देतो. नागरिकांना वाटतें नगरपिता असावा तर असा. पण आपलाहि नगरपिता एक सुंदर ' कलावंत ' आहे हें त्यांना अनुभवाने कळतें. वर्ष निघून जाते आणि रस्ता राहून जातो. " खऱ्या कलावंताची किंमत लवकर कळत नाही, " असं जें म्हणतात, तें त्यांना मग पटतं.

असे कितीतरी ' कलाकार ' आपल्या अंवतीभंवती आहेत. पैसे मागणाऱ्यास, " पुढील महिन्यांत नक्की पैसे देतो, " असें म्हणणारे कित्येक आढळतात. महिने निघून जातात पण बिलाची रक्कम कांहीं रोडावत नाहीं. पैसे देण्याची त्यांची ही ' कला ' पाहिली म्हणजे वाटतें-प्रत्येक मनुष्य हा ' कलाकार ' आहे हेंच खरें.

दुधांत पाणी टाकूनहि, " मी दुधांत पाणी टाकत नाहीं, " असं सांगणारा गवळी हाहि एक कलावान आहे. लहानापासून मोठ्यापर्यंत आणि पोरापासून थोरापर्यंत, सर्वच कलाकार आहेत.

' सध्याचें जग ' तर असल्या कलाकारांनी कसें गच्च भरून गेलें आहे. पुढाऱ्याचें बोलणें ऐका, डॉक्टरकडे जा, वकिलांची वकिली ऐका किंवा एखाद्या मास्तराकडे पहा या सर्व व्यक्तींत या कलेचें पैलू कसे शोभून दिसतील. कुणांतील प्रथम दर्शनी तर कित्येकांचें सूक्ष्म अवलोकनानंतर.

माझ्या मनांत आलें मित्राला सांगावें, बाबारे आजच्या जगांत एकच कला प्रमुख आहे. तिला आपली ' पट्टराणी ' करण्याची जणूं कांहीं स्पर्धाच चालूं आहे. ती कला म्हणजे-खोटें बोलणें. * * *

## जागेपणांतील स्वप्नें

परवां मी माझ्या एका मित्राकडे त्याच्या गांवाला गेलों होतों. त्यानें माझें अंथरुण पडवीत टाकलें. माझा व त्याचा पलंग समोरासमोरच होता. आम्हीं दोघांनीं रात्रीं बारा वाजेपर्यंत अंथरुणावर पडल्यापडल्या गप्पा मारल्या. शेवटीं जेव्हां आम्हांला, एकामागें एक जांभया आल्या, तेव्हां आतां गप्पा मारणें बंद करून झोंप घ्यावी असें आम्हीं ठरविलें. आपल्या अंगावर रंग ओढीत माझा मित्र म्हणाला,-" अरे, हो, या पडवींत तूं निजतो आहेस खरा, पण इथें निजणाऱ्याला फार स्वप्नं पडतात बरं- "

माझ्या मित्राच्या त्या वाक्याचें मला तर हसूंच आलें. हंसता हंसता विनोदानें मी त्याला म्हटलें-" पण तीं खरीं होत नाहींत ना ? झालं तर मग. "

मला त्या दिवशीं त्या मित्राचें घरीं स्वप्न पडलें किंवा नाहीं, कोण जाणे. पण एवढें मात्र खरें कीं, मला जर झोपेंत बरेंच दिवसांत स्वप्न पडलें नाहीं तर बरें वाटत नाहीं. असें म्हटलें तर शरीरशास्त्रज्ञ म्हणतील-" अहो, झोंपेंत स्वप्न पडणं आरोग्याच्या दृष्टीनं वाईट आहे. कांहीं गाढ झोंपेचं लक्षण नाहीं. "

मी मात्र त्यांच्या या वाक्याला खरोखरीच हसेन. मनुष्याला झोंपेतच स्वप्नें पडतात असें नाहीं, तर जागेपणींसुद्धां त्याला स्वप्नें पडतात. स्वप्न हें मनुष्याला सुख देणारें व पैसा खर्चितां मिळणारें एक उत्तम साधन आहे. स्वप्नें हीं खरीं नसतात हें कबूल आहे. तीं नुसता आभास निर्माण करणारीं असतात. आणि सत्यापेक्षां सत्याभासच मनुष्याला जास्त प्रिय असतो. आपण जें ललितवाङ्मय वाचतो, त्यांत एकभार सत्य अनेकभार असत्य असेल तरच तें वाङ्मय आपल्याला आवडेल. निव्वळ सत्याचें दर्शन जर त्या वाङ्मयांत घडून आलें, तर तें कितीजणांना रुचेल? नाटकांत रंगभूमीवर दाखवावयाची खोली तीन भिंतीचीच दाखवावी लागते. ती जर चार भिंतींची दाखविली तर त्या थिएटरांच्या चार भिंतींत एकहि प्रेक्षक राहणार नाहीं. अतिशयोक्ति, अवास्तवता याच गोष्टी मनुष्याला जास्त प्रिय असतात. स्वप्नें म्हणजे तरी काय याहून निराळीं असतात? तीं असत्य असतात. स्वप्नें पाहून तीं सत्य करून दाखविणारे सर्वच कांहीं हरिश्चंद्र नसतात.

माणसाच्या मनांत इच्छा आणि आकांक्षा असतात. पण अशीं किती माणसें आहेत कीं ज्यांच्या इच्छा व आकांक्षा सफल होतात! पण त्यांच्या ह्या इच्छा, आकांक्षा सफल झालेल्या पाहणं त्यांना फक्त एका गोष्टींत शक्य होतं, ती म्हणजे स्वप्न. मनुष्य एकटा असूं द्या म्हणजे मग पहा तो कसा आपल्या मनांत भविष्याचीं चित्रें रंगवूं लागतो. झोपेंत असतांना आपल्याला स्वप्नें दिसतात. तरीपण जागेपणीं तर आपण नुसत्या कल्पनेनेंच तीं रंगवितो; आणि त्या स्वप्नमय सृष्टींत खुशाल विहार करतों. अशा तऱ्हेचीं जागेपणींचीं स्वप्नें जर आपण

पाहूं शकलों, तर आयुष्यांतल्या फार मोठ्या आनंदाला आपण आंच-वलों असतो.

जागेपणांतील स्वप्नांच्या बाबतींत लहान मुलें आणि मोठीं माणसें यांत काडीचाहि फरक नाहीं. अल्प पैसा शिलकींत असलेला मनुष्य, आपल्या मालकीचा बंगला, यापुढें उभी असलेली मोटार गाडी, एक छोटीशी बाग—या गोष्टी जागेपणांतील स्वप्नांत पहातोच किनई ! आपल्या भावी पतीचें रूप, रुबाब कोणती उपवर मुलगी जागेपणींच्या स्वप्नांत पाहत नाहीं. कशी तरी कारकुनाची नोकरी मिळालेला मनुष्य उघडया डोळ्यासमोर आपण पुढें मामलेदार झालों आहे, हाताखालच्या लोकांना, आपण आपल्या हुशारीनें कारकुनापासून काम करीत अखेर मामलेदार कसें झालों हें सांगतोंच किनई. मनुष्याला निजल्यावर काय पण चांगलें जागेपणीं सुद्धां स्वप्नें पडतात. मनुष्याचे मनोरथ हीं त्याच्या जागेपणांतील स्वप्नेंच होत.

रस्त्यानें दुधाचें भांडें डोक्यावर नेणाऱ्या गवळणीची किंवा आपलीं मडकीं स्वतःच काठीनें फोडणाऱ्या कुंभाराची; या दोन्ही गोष्टी म्हणजे अनेक लोकांचीं जागेपणचींच स्वप्नें नव्हेत काय ? लेखकाचें साहित्य हें त्यानें पाहिलेलें जागेपणांतील स्वप्नच असतें.

मनुष्याला जर हीं जागेपणांतील न्यप्नें पडलीं नाहींत, तर ती खरो-खरीच फार दुःखी होतील. एखादी गोष्ट प्राप्त होत नाहीं तोपर्यंतच तिच्याबद्दल आपल्याला फार आकर्षण वाटतें. पण एकदा का ती गोष्ट मिळाली म्हणजे तिची किंमत वाटेनाशी होते. स्वप्नें हीं त्याला अपवाद नाहींत. जागेपणांतील स्वप्नांत पाहिलेल्या गोष्टी, जर आपल्याला प्राप्त

मराठी ग्रंथ

झाल्या तर त्या स्वप्नांना किंमत राहणार नाहीं. असल्या या स्वप्नांतील गोष्टींच्या दुर्लभतेंतच मनुष्याचें खरें सुख सांठविलें आहे. तें सुख याच्यापासून कुणीच हिरावून घेऊं शकत नाहीं. नाहीं कां ?

* * *

## नशा

बरेच वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. त्यावेळीं कांहीं दारूबंदी नसावी. ती जर असती तर मला त्या रस्त्यानें तो इसम असा लटपटत चाललेला दिसलाच नसता. तो कसे तरी पाय टाकीत होता. अन् तोंडानं मधून मधून बडबडत होता. मी त्याच्या जवळून जाऊं लागलों. उत्सुकतेनं मी त्याच्याकडे पाहिलं. मी अशा रीतीनं त्याच्याकडं पाहत असतांनाच माझ्याजवळून एक इसम गेला. माझ्याजवळ थबकून तो मला म्हणाला— काय पाहतां साहेब; त्यानं झोकली आहे. अन् त्याला चढली आहे नशा.

तो नशेंत आहे हें मला सांगण्याची गरज होती असं नाहीं. त्याच्याकडं पाहतांच त्याला नशा चढली आहे हें माझ्या चटकन् ध्यानात आलं होतं. पण माझं मन—

माणसाचं मनच मोठं तऱ्हेवाईक, नाहीं कां ? ढग वाऱ्याच्या दिशेनं पळतील, पाणी उताराकडेच धावेल पण माणसाचं मन मात्र कुणीकडे धांवेल याचा नेमच नसतो.

माझ्या मनांतून तो दारू पिऊन तर्रर ऽऽ झालेला इसम केव्हांच नाहींसा झाला. पण ' तो नशेंत आहे ” ' त्याला नशा चढली आहे,' हीं वाक्यें मात्र कांहीं केल्या मनांतून, जातचनात.

मांजराच्या छोट्या पिलानं लोकरीच्या एखाद्या तुकड्याशीं खेळावं तसंच माझं मन " नशा " या शब्दाभोंवतीं खेळूं लागलं. मला वाटलं— हीं ' नशा ' ही फक्त दारुड्यालाच येते असं नाहीं. आपलीं ज्ञानेंद्रियं जर तल्लख असलीं तर आपणाला एकच काय पण कितीतरी नशाबहाद्दर दिसूं लागतील. मनुष्य पैसे मिळविण्याच्या मागें लागला म्हणजे त्याला एक प्रकारची नशा चढते. त्या नशेच्या भरांत, खरं-खोटं, नीति-अनीति, ग्राह्य-अग्राह्य याचा विचार त्याच्या मनांत चुकून येत नाहीं. नी येत असला तरी पैशाच्या नशेंत, तो ते सर्व विसरून जातो.

माझं मन मला बजावूं लागलं—बाबारे, ही नशा येथेंच सोडून दे. जरा खोलवर विचार कर. तिचं दुसरं रूप तर पहा—

लेखक कां लिहितो ? त्याला लिहिण्याची नशा चढते म्हणून. लेखनापुढं त्याला कांहींच सुचत नाही. त्या नशेंतच त्याचे हातून सुंदर सुंदर वाङ्मय निर्मिति होते. लेखनाची नशा जोंपर्यंत चढत नाहीं, तोंपर्यंत त्याचें हातून श्रेष्ठ कलाकृति कशी निर्माण होईल ? जें लेखकाचं तेंच इतरांचं.

खेळाडूचं तरी काय होतं. खेळाची नशा चढल्याशिवाय त्याचा खेळ रंगत नाहीं. ती धुंद त्याला चढली म्हणजे विरुद्ध पक्षावर जय मिळविण्याचा पराक्रम तो करून दाखवितो. उत्कृष्ट नटाची गोष्ट याहून कांहीं निराळी असते काय ? नाहीं. अभिनयाची नशा त्याला चढली म्हणजे तो, वठवीत असलेल्या भूमिकेशीं इतका एकरूप होतो कीं, आपण स्वतः कोण आहों याचा त्याला अल्पकाल का होईना

विसर पडतो. अन् त्याच्या यशाचा मृदुंग प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या रूपानं वाजूं लागतो.

कुठलंहि यश प्राप्त करायचं म्हणजे त्या कार्याची नशा चढावयास पाहिजे हेंच खरं. हें म्हणणं आयुष्यांतील कित्येक क्षेत्रांत लागूं पडतं हें कांहीं खोटं नाहीं. कुठलंहि काम करतांना मनुष्याला त्या कामाची नशा चढली पाहिजे. त्या कामाशिवाय त्याला इतर सर्व गोष्टींचा विसर पडला पाहिजे. समाजसेवेची नशा ज्यांना ज्यांना चढते, त्यांच्याच हातून समाजकार्य होतं. देशाच्या सेवेची नशा चढल्याशिवाय खरी देशसेवा होऊं शकणार नाही. परमेश्वर प्राप्तीकरितां मनुष्याला भक्तीची अपरंपार ‘ नशा ’ चढली पाहिजे. भक्तीच्या नशेंत त्याला देहाचा सुद्धां विसर पडला पाहिजे. ज्यांना देहाचा विसर पडला, त्यांनाच परमेश्वर दिसला. ज्यांना ज्यांना आपल्या देहाची जाणीव आहे, त्यांना त्यांना परमेश्वराचंच काय पण इतरहि गोष्टींचं विस्मरण पडतं.

नशेच्या पोटींच यशाचा जन्म होतो, असं जर आपण म्हटलं तर त्यांत चूक ती काय आहे ?

शाखा (स्थळ प्रत)
90८६९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

REFBK-0010871
REFBK-0010871

तुरुंगांतून लिहिलेल्या ओजस्वी व बोधप्रद पत्रांचा संग्रह

**मनाच्या झरोक्यांतून**

लेखक : डॉ. ना. सू. हर्डीकर,

[ प्रमुख, अखिल भारतीय कॉंग्रेस सेवादल ]

किंमत : फक्त अडीच रुपये

रा म कृ ष्ण बु क डे पो, मुं ब ई ४



कव्हर-सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४.